**ठळक बातम्या**

- ऑनलाइन गेमिंगचा प्रसार आणि नियमन विधेयक, २०२५ ला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची मंजुरी

- सत्तेबाहेर जायच्या भितीनं अटकेनंतर महिनाभरात राजीनामा द्यावा लागेल या घटनादुरुस्तीला विरोधकांकडून विरोध होत असल्याची प्रधानमंत्र्यांची टीका

- बिहारमध्ये मसुदा मतदार याद्यांमधून वगळण्यात आलेल्यांना आक्षेप नोंदवण्यासाठी राजकीय पक्षांनी मदत करावी, अशी सर्वोच्च न्यायालयाची सूचना

- श्रीलंकेचे माजी अध्यक्ष रानील विक्रमसिंघे यांना अटक

**आणि**

- कझाकस्तानमधे सुरु असलेल्या १६ व्या आशियाई नेमबाजी स्पर्धेत भारताच्या एलावेनील वालारिवनला सुर्वणपदक

**<><><><><>**

ऑनलाइन गेमिंगचा प्रसार आणि नियमन विधेयक, २०२५ ला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज मंजुरी दिली. हे विधेयक परवा लोकसभेत, तर काल राज्यसभेत मंजूर झालं होतं. ई-स्पोर्ट्स, शैक्षणिक आणि सामाजिक गेम्स यासह ऑनलाइन गेमिंग क्षेत्राला चालना देणं आणि त्यावर नियमन आणणं, हा या विधेयकाचा उद्देश आहे. याद्वारे गेमिंग क्षेत्राबाबत राष्ट्रीय पातळीवर एक कायदेशीर चौकट तयार केली जाईल. तसंच कोणत्याही प्रकारे ऑनलाईन गेम्सद्वारे सेवा, जाहिरातींच्या रूपाने पैशांच्या देवाणघेवाणीवर पूर्ण बंदी करायची तरतूद या विधेयकात आहे. तसंच या कायद्याचं उल्लंघन केल्यास तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि एक कोटी रुपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्ही अशा शिक्षेची तरतूद हे विधेयक करतं. याद्वारे, अशा गेम्समध्ये फसवणूक होऊन नागरिकांवर, विशेषतः तरुणांवर होणारे सामाजिक, आर्थिक, मानसिक आणि गोपनीयतेशी संबंधित दुष्परिणाम टाळायला मदत होईल.

आयकर कायदा २०२५लाही काल राष्ट्रपतींनी मंजुरी दिल्यानंतर त्याचं राजपत्र प्रसिद्ध झालं. आयकराशी संबंधित कायद्यांचं एकत्रीकरण आणि दुरुस्ती हा कायदा करतो. हा नवा कायदा पुढच्या वर्षी १ एप्रिलपासून लागू होणार आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्र्यांपासून ते मुख्यमंत्र्यांसहित कोणत्याही मंत्र्याला अटक झाल्यास जर ३० दिवसांच्या आत त्याला जामीन मिळाला नाही तर ३१व्या दिवशी त्याला राजीनामा द्यावा लागेल असा कायदा केंद्र सरकार आणू पाहत आहे, परंतु सर्व विरोधी पक्ष याला विरोध करत आहेत, अशी टीका प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केली. बिहारच्या गयाजी इथं आज ते एका जाहीर सभेत बोलत होते. प्रधानमंत्र्यांनी इथं ऊर्जा, रस्ते, आरोग्य, नगरविकास आणि पाणीपुरवठा क्षेत्रातल्या १३ हजार कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण केलं. मोदी यांनी गया ते दिल्ली अमृत भारत एक्सप्रेस गाडी आणि वैशाली ते कोडरमा बुद्धिस्ट सर्किट गाडीला हिरवा झेंडा दाखवला. प्रधानमंत्री आवास योजनेच्या १६ हजारापेक्षा जास्त लाभार्थ्यांपैकी काहींना त्यांनी घरांच्या चाव्या सुपूर्द केल्या. या प्रकल्पांममुळे बिहारच्या उद्योगजगताला मोठी चालना मिळेल आणि तरुणांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमधलं तृणमूल काँग्रेसचं सरकार जनकल्याणाच्या बाबतीत गंभीर नाही. केंद्र सरकारनं पाठवलेला निधी पक्षाच्या कार्यकर्त्यांना दिला जातो असा आरोप प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केला. कोलकत्यात परिवर्तन संकल्प सभेला ते संबोधित करत होते. पश्चिम बंगालमधून तृणमूल काँग्रेसला हद्दपार करुन भाजपाला स्वीकारण्याचं आवाहन त्यांनी नागरिकांना केलं.

***होल्ड... बाइट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज ३ मेट्रो प्रकल्पांचं लोकार्पण झालं. यावेळी त्यांनी मेट्रोतून प्रवास केला. यामुळं हावडा, कोलकता आणि आसपासच्या ग्रामीण भागाशी संपर्क वाढणार आहे.

**<><><><><>**

अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांनी आज राष्ट्रपती भवन इथं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. ग्रुप कॅप्टन प्रशांत नायर, ग्रुप कॅप्टन पुण्यश्लोक बिस्वाल, इस्त्रोचे अध्यक्ष डॉ. व्ही. नारायणन आणि ह्यूमन स्पेस फ्लाइट सेंटरचे संचालक दिनेश कुमार सिंह यावेळी उपस्थित होते. राष्ट्रपतींनी या संपूर्ण चमूला त्यांच्या भविष्यासाठी, विशेषतः गगनयान मोहिमेसाठी शुभेच्छा दिल्या.

**<><><><><>**

नवोन्मेष आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीला प्रोत्साहन देऊन आणि स्थानिक कंपन्यांना वाढीसाठी पोषक वातावरण तयार करुन एक मजबूत संरक्षण यंत्रणा देश तयार करत आहे, असं प्रतिपादन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी आज नवी दिल्लीत एका कार्यक्रमात केलं. फिफ्थ जनरेशनचं लढाऊ विमान आणि विमानांचं इंजिन तयार करणं तयार करायच्या दिशेनं भारताचा प्रवास सुरू आहे, असंही सिंह यांनी सांगितलं. सर्व परदेशी कंपन्या आणि गुंतवणूकदारांनी भारतातल्या संरक्षण क्षेत्रात गुंतवणूक करावी, असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

बिहारमध्ये मतदार याद्या पुनरीक्षण प्रक्रियेच्या मसुदा मतदार याद्यांमधून वगळण्यात आलेल्यांना आक्षेप नोंदवण्यासाठी राजकीय पक्षांनी मदत करावी, अशा सूचना सर्वोच्च न्यायालयानं आज दिल्या. बिहारमध्ये विविध राजकीय पक्षांचे १ लाख ६० हजारापेक्षा जास्त बूथ-लेव्हल एजंट्स असूनही निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार फक्त दोन आक्षेप नोंदवण्यात आल्याबद्दल न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जयमाल्य बागची यांच्या पीठानं आश्चर्य व्यक्त केलं, मात्र, या एजंट्सना त्यांचे आक्षेप नोंदवायची परवानगी नसल्याचं राजकीय पक्षांचं म्हणणं न्यायालयानं मान्य केलं. या मतदारांना आवश्यक ते अर्ज भरायला मदत करावी, असे निर्देश बूथ-लेव्हल एजंट्सना राजकीय पक्षांनी द्यावेत, असंही न्यायालयानं सांगितलं. मतदार याद्यांमध्ये नावाचा समावेश करण्यासाठी निवडणूक आयोगाच्या यादीतली ११ कागदपत्रं किंवा आधार कार्ड सादर करावं, असंही सर्वोच्च न्यायालयानं नमूद केलं.

**<><><><><>**

भटक्या कुत्र्यांचा प्रश्न व्यापक असून सर्व केंद्रशासित प्रदेश आणि राज्यांनी याबाबत एक देशव्यापी धोरण तयार करावं, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं आज दिले. तसंच,

विविध उच्च न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या या आणि इतर तत्सम विषयांवरच्या याचिका सर्वोच्च न्यायालयाकडे वर्ग करायच्या सूचनाही न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संदीप मेहता आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजरिया यांच्या पीठानं दिल्या. दिल्ली-राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात पकडलेल्या भटक्या कुत्र्यांपैकी रेबीजची लागण झालेले आणि आक्रमक कुत्रे वगळता इतर कुत्र्यांची नसबंदी आणि लसीकरण करून त्यांना त्यांच्या भागात सोडून द्यावं, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं दिले. भटक्या कुत्र्यांना खाऊ घालण्यासाठीच्या जागा निश्चित कराव्यात, त्यांना सार्वजनिक ठिकाणी खाऊ घालता येणार नाही, यावरही पीठानं भर दिला. काही दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाच्या एका वेगळ्या पीठानं दिल्ली-राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातल्या सगळ्या भटक्या कुत्र्यांना पकडून निवारा केंद्रांमध्ये हलवायचे निर्देश दिले होते.

<><><><>

सर्व शेतकऱ्यांना वेळेवर आणि पुरेशी खतं देण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे. खतांचा काळा बाजार, साठेबाजी, जास्त किंमतीत खतांची विक्री हे प्रकार टाळण्यासाठी सर्व राज्यंनी कारवाई करावी, असा सल्ला केंद्रीय रसायनं आणि खतं मंत्रालयानं दिला आहे. शेतकऱ्यांना पुरेसं खतं उपलब्ध व्हावं यासाठी खतांचं उत्पादन वाढवलं आहे. गेल्या १० वर्षांत युरियाचं उत्पादन ३५ टक्क्यांनी वाढून ३०६ लाख मेट्रिक टनांवर गेलं आहे. DAP, NPKS या खतांचं उत्पादनही गेल्या १० वर्षात ११० लाख मेट्रीक टनांवरुन १५८ लाख मेट्रिक टनांवर गेलं आहे, असं मंत्रालयानं कळवलं आहे.

<><><><>

श्रीलंकेचे माजी अध्यक्ष रानील विक्रमेसिंघे यांना आज अटक केली. सरकारी पैसा लंडन दौऱ्यासाठी वापरल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. हा दौरा अधिकृत नसूनही सरकारी पैशांचा वापर त्यासाठी झाला, असा दावा तपास अधिकाऱ्यांनी केला. या महिन्याच्या सुरुवातीला राष्ट्राध्यक्षांचे माजी अध्यक्ष समन एकनायके आणि माजी खासगी सचिव सँड्रा पेरेरा यांचीही या प्रकरणी चौकशी झाली होती.

<><><><>

कझाकस्तानमधे सुरु असलेल्या१६ व्या आशियाई नेमबाजी स्पर्धेत महिलांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात भारताच्या एलावेनील वालारिवननं सुर्वणपदक पटकावलं. अंतिम

फेरीत तिनं २५३ पूर्णांक ६ दशांश गुण मिळवले. हा नवा राष्ट्रीय विक्रम आहे. चीनच्या पेंग शिनलूनं रौप्य, तर दक्षिण कोरियाच्या क्वॉन युन जी हिनं कांस्यपदक पटकावलं.

**<><><><><>**

देशात सेमीकंडक्टर डिझाइनची क्षमता वाढवण्यासाठी केंद्र सरकारनं चिप डिझाइनच्या २३ प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. सीसीटीव्ही कॅमेरे, विजेचे मीटर, मायक्रोप्रोसेसर आणि नेटवर्किंग उपकरणांसाठी या चिप उपयोगात येणार आहे.

**//<><><><><>//**